**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १२**

**जानेवारी २०१९**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक १७ जानेवारी २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र. १०३४**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३२८ दि. २५/१/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८६, दि.२१/६/२०१७

३) मनपा ठराव क्र.१४९, दि.२१/७/२०१७

४) मनपा ठराव क्र.७१०, दि.२०/१२/२०१७

५) मनपा ठराव क्र.१९०, दि.१९/७/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे –

सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक 'अ' चे रक्कम रुपये ३७,६०,३४,००,०००व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रुपये ७,५९,१८,८२,७२६ असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रुपये ४५,१९,५२,८२,७२६ चे अंदाजपत्रकास मा. मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमा खर्चास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**अंदाजपत्रक 'अ'**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल, २०१५ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०१५–१६ मधील जमा | ३३,७८,७२,५९,९३१ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ३३,७८,७३,५९,९३१ |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०१५–१६ मधील खर्च | ३३,७३,४६,७२,२०६ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | ३३,७३,४७,७२,२०६ |
| ४ | वर्षात येणारी शिल्लक | ५,२५,८७,७२५ |
| ५ | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम (२०१५–१६ मधील अप्रत्यक्ष खर्च) | १२,६०,०७,५८० |
| ६ | अंदाजपत्रक 'अ' ची सन २०१५–१६ ची एकूण तूट | ७,३४,१९,८५५ |

**अंदाजपत्रक 'क'**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल, २०१५ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०१५–१६ मधील जमा | ६,९८,६१,५७,३७५ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ६,९८,६२,५७,३७५ |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०१५-१६ मधील खर्च | ६,९७,८९,३९,४२८ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | ६,९७,९०,३९,४२८ |
| ४ | अंदाजपत्रक 'क' ची सन २०१५-१६ ची शिल्लक | ७२,१७,९४७ |

| | | |
|---|---|---|
| १ | अंदाजपत्रक 'अ' ची सन २०१५-१६ ची एकूण तूट | ७,३४,१९,८५५ |
| २ | अंदाजपत्रक 'क' ची सन २०१५-१६ ची एकूण शिल्लक | ७२,१७,९४७ |
| ३ | अंदाजपत्रक 'अ' व 'क' ची सन २०१५-१६ ची एकूण तूट | ६,६२,०१,९०८ |

सन २०१५-१६चे हिशोबामध्ये रक्कम रुपये ६,६२,०१,९०८इतकी तूट येत आहे.तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

| | निधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | भांडवली निधी | ६,६२,०१,९०८ |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१०, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०३५</u>

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/८०४ दि.१५/१/२०१८ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८४४,दि.१६/१/२०१८

३) मनपा ठराव क्र.१९९,दि.१९/७/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक 'अ'चे रक्कम रूपये ४७,८९,६५,०९,८०० व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रूपये ९,५८,३५,००,००० असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रूपये ५७,४८,००,०९,८०० चे अंदाजपत्रकास मा.मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमा खर्चास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**अंदाजपत्रक 'अ'**

| | | |
|---|---|---|
| | **जमा बाजू** | |
| १ | दिनांक १ एप्रिल २०१६ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०१६-१७ मधील जमा | ३०,७६,०३,८६,३२५ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ३०,७६,०४,८६,३२५ |
| | खर्च बाजू | |
| १ | सन २०१६-१७ मधील खर्च | ४२,१२,२४,९८,५८६ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षा अखेरीच्या शिलकेसह खर्च | ४२,१२,२५,९८,५८६ |
| ४ | वर्षात येणारी तूट | ११,३६,२१,१२,२६१ |
| ५ | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम ( २०१६-१७ मधील अप्रत्यक्ष खर्च ) | १३,६०,९८,८८१ |
| ६ | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन २०१६-१७ ची एकूण तूट | ११,४९,८२,११,१४२ |

**अंदाजपत्रक 'क '**

| | | |
|---|---|---|
| | **जमा बाजू** | |
| १ | दिनांक १ एप्रिल २०१६ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०१६-१७ मधील जमा | ६,५२,४१,९९,०४६ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ६,५२,४२,९९,०४६ |
| | **खर्च बाजू** | |
| १ | सन २०१६ – १७ मधील खर्च | ११,३७,३१,६१,४५३ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |

| | | |
|---|---|---|
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | ११,३७,३२,६१,४५३ |
| ४ | अंदाजपत्रकाची ' क' ची सन २०१६-१७ ची तूट | ४,८४,८९,६२,४०७ |
| १ | अंदाजपत्रकाची ' अ ' ची सन २०१६-१७ ची तूट | ११,४९,८२,११,१४२ |
| २ | अंदाजपत्रकाची ' क ' ची सन २०१६-१७ ची तूट | ४,८४,८९,६२,४०७ |
| ३ | अंदाजपत्रकाची ' अ ' व ' क ' ची सन २०१६-१७ ची तूट | १६,३४,७१,७३,५४९ |

सन २०१६-१७ चे हिशोबामध्ये रक्कम रूपये १६,३४,७१,७३,५४९ इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

| निधी | | |
|---|---|---|
| १ | भांडवली निधी | ८,६३,८८,२१,८४० |
| २ | भूमी संपादन | ६८,८६,७९,००० |
| ३ | युवक कल्याणकारी योजना | २,४१,२९,७०९ |
| ४ | पाणीपुरवठा + गटारे व नाले | २,७३,२६,४२,००० |
| ५ | पाणीपुरवठा + गटारे व नाले प्रकल्प | ४,२६,२९,०१,००० |
| | एकूण | १६,३४,७१,७३,५४९ |

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९११, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

**विषय क्र. १०३६**

संदर्भ – १) मा.अविनाश बागवे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०४,दि.२७/२/२०१८
३) मनपा ठराव क्र.१७४,दि.१९/७/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.१९ मधील सावित्रीबाई फुले प्रशाला येथील विकसित मैदानावर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरिता मोफत फुटबॉल ॲकॅडमी हा संयुक्त प्रकल्प पुणे महानगरपालिका व लहुजी फुटबॉल क्लब यांच्या वतीने राबविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१२, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

**विषय क्र. १०३७**

संदर्भ – मा. फरजाना शेख व मा. सोनाली लांडगे यांची सूचना दिनांक ३१/१/२०१८.
१) मा.दिलिप बराटे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १६/१/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८३१,दि.१६/१/२०१८

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ पर्वती स.नं. १२०अ+१२०ब, १२४/२ टि.पी.स्किम नं.३ फा.प्लॉट नं. ५४५ क्षेत्र २७ एकर १३ गुंठे ही जागा नगररचना योजनेनुसार विटभट्टीसाठी सन १९६३ साली पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे.

सदर जागेमध्ये पुणे महानगरपालिकेने विटभट्टीधारकांचे कायम स्वरुपी पुनर्वसन करणेसाठी लेआऊट तयार करण्यात आला. त्यामध्ये एकूण ४० प्लॉट दर्शविण्यात आले. सदरचे प्लॉट विटभट्टीधारकांना साठेखताने व नंतर खरेदीने देण्यात आले आहेत.

मूळ जागा मालक श्री.मधुकर नामदेव राऊत यांनी सदर जागेबाबत मे.उच्च न्यायालयात रिटपिटीशन नं. ६२४६/९९ ने दाखल केले. त्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या आदेशाविरुध्द पुणे मनपाने रिटपिटीशन नं.५९४/२००७ ने दाखल केले होते. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि. १४/७/२०१७ दिलेल्या निर्णयान्वये शासनाचे आदेश रद्द केले आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द जागा मालक श्री.मधुकर नामदेव राऊत यांनी मे.उच्च न्यायालयात पुर्नविलोकन (रिव्हीजन) अर्ज दाखल केला आहे. दरम्यान मुळ जागा मालक यांनी फा.प्लॉट नं. ५४५

या जागेच्या मोबदल्यापोटी सध्या पुणे मनपाच्या ताब्यात असलेले प्लॉट नं. १. १३. २४. ३७ व ४० हे मालकी हक्काने परत मिळावेत असा विनंती अर्ज केला आहे. त्यास अनुसरुन नगररचना योजना क्र. ३ अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या फा.प्लॉट नं. ५४५ च्या मोबदल्यापोटी वरीलप्रमाणे महानगरपालिकेकडे शिल्लक असलेले ५ प्लॉटपैकी प्लॉट नं. २४ वगळून उर्वरित चार प्लॉट मालकी हक्काने मूळ जमीन मालकांना नगररचना योजना अंतर्गत मोबदला म्हणून देणेबाबत विशेष बाब म्हणून राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय व्हावा अशी विनंती करण्यास व या प्रकरणी राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र. ९८८, दिनांक २९/१/२०१८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.दिलिप बराटे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १६/१/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८३१,दि.१६/१/२०१८
३) मनपा ठराव क्र.१६९, दि.१९/७/२०१८

----

मनपा ठराव क्र. ९८८, दिनांक २९/१/२०१८ चा दप्तरी दाखल करण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१६, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र. १०३८</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२८६, दि.२३/७/२०१८ चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२९ दि.२७/७/२०१८
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९५७, दि.२८/८/२०१८
४) मनपा ठराव क्र.५२१,दि.२७/९/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ पर्वती स.नं.७५/७६, समतानगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुलातील फक्त जलतरण तलाव ३ वर्षे कालावधी लिव्ह अॅण्ड लायसन्स पध्दतीने चालविणेस देणेसाठी निविदा मागविली असता मे.ओम सिमेंन्ट प्रॉडक्टस तर्फे प्रो.प्रा.हेमंत सोलंकी यांची एकच निविदा आली असल्याने त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रू.३६,५९९=९९( अक्षरी र.रू.छत्तीस हजार पाचशे नव्याण्णव पैसे नव्याण्णव फक्त) ही मनपा निर्धारित मासिक र.रू.३६,४५०/– (अक्षरी र.रू. छत्तीस हजार चारशे पन्नास फक्त)पेक्षा र.रू.१४९=९९ (अक्षरी र.रू.एकशे एकोणपन्नास पैसे नव्याण्णव फक्त) ने जास्त असल्याने त्यांचेकडून शासकीय नियमानुसार प्रतिमहा भाडे रकमेवर वस्तु आणि सेवा कर प्रचलित दराने भरून घेणेस त्यांची निविदा स्विकारून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्ती प्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेस,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२०, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र. १०३९</u>**

संदर्भ – १) मे.महाराष्ट्र शासन यांचेकडील जा.क्र. टीपीएस.–१८१७/१०९१/प्र.क्र.१८४/१७/नवि/–१३ दि.१७/१/२०१८ रोजीचे पत्र.
२) इकडील आ.क्र. ६६२५ दि.२३/३/२०१८ रोजीचे मे.संघवी इरेक्टर प्रा.लि. तर्फे श्री.अनिल संघवी यांचे पत्र
३) श्री.अनिल संघवी यांची दि.११/७/२०१७ रोजीची खरेदी सुचना (परचेस नोटीस)
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/९७ दि.३०/५/२०१८ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.६९६,दि.२४/७/२०१८
६) मनपा ठराव क्र.६६५,दि.२८/९/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ संगमवाडी टी.पी.स्किम, अंतिम भूखंड क्र. ३३, येथील मिळकतीवरील मान्य विकास आराखडा सन २०१७ नुसार आरक्षण 'एम.पी.–१७ (Municipal Purpose)' ३०३२.११ चौ.मी. क्षेत्र आरक्षित असलेल्या

मिळकतीची जागा भूसंपादन कायद्यान्वये अथवा एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ४९(७) अन्वये जागा ताब्यात घेणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२१, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

**विषय क्र. १०४०**

संदर्भ – १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २१/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२२, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरने पुरविणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र.२१८, अ.क्र.८, प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील माधवनगर, कमल पार्क परिसरात सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे व तदनुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम– | | |
| प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरने पुरविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४१**

संदर्भ – १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २१/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२३, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरने पुरविणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र.२१८, अ.क्र.९, प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कलवड, खेसे पार्क परिसरात सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे व तदनुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरने पुरविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४२**

संदर्भ – १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २१/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२४, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १ क (कळस–धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरने पुरविणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र.२१८, अ.क्र.७, प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कळस, विश्रांतवाडी परिसरात सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टॅंकरने पुरविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४३**

संदर्भ - १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २१/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२५, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टॅंकरने पुरविणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र.२१८, अ.क्र.६, प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील भैरवनगर परिसरात सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे व तद्नुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील विविध ठिकाणी पिण्याचे पाणी टॅंकरने पुरविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४४**

संदर्भ - १) मा.सौ.परविन शेख यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२६, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २७ ब मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २६, अ.क्र. २, शहरामध्ये पाण्याच्या लाईन टाकणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.३९, अ.क्र.२०३, प्रभाग क्र. २७ ब मध्ये सं.नं .४२ ,व विविध ठिकाणी नविन पाण्याची लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र. २७ ब मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४५**

संदर्भ - १) मा.सौ.हमीदा सुंडके यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२७, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २७ क मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या अभ्यासिका वर्ग बांधणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, ७. आरोग्य विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ६, शहरातील विविध स्मशानभूमी/दफनभूमी, दशक्रिया विधी, घाट बांधणे व विविध विकासकामे करणे (यादी क्र. एसजे १२), पान क्र.२४५, अ.क्र.६३, प्रभाग क्र. २७ क मध्ये नुराणी कब्रस्तानाच्या भिंतीला रंगविणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २७ क मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या अभ्यासिका वर्ग बांधणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. १०४६</u>**

संदर्भ - १) मा.सौ.परविन शेख यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२८, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २७ ब मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या अभ्यासिका वर्ग बांधणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १२, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.२०३, अ.क्र.६००, प्रभाग क्र.२७ ब मध्ये साईबाबानगर येथे रस्ता कॅांक्रिटीकरण करणे व तदनुषिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम-<br>प्रभाग क्र. २७ ब मध्ये कोंढवा खुर्द मिठानगर मधील ॲमिनिटी जागेवर आरक्षित असलेल्या अभ्यासिका वर्ग बांधणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. १०४७</u>**

संदर्भ - १) मा.राजाभाऊ बराटे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९२९, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे शहरामध्ये व प्रभाग क्र. ३१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी साठी र.रुपये १.२० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०८, अ.क्र.१०, शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तदनुषंगिक कामे करणे (यादी क्र. एल २), पान क्र.२३२, अ.क्र.३, (CE20D 214+) नदी सुधारणा राबविणे (पीपीपी/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यामातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | १.२० कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे -** | | |
| १) पुणे शहरातील विविध व्यायाम शाळांमध्ये विविध प्रकारचे व्यायामचे साहित्य बसविणे. | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र ३१ ड मध्ये डॉ.बाबसाहेब आंबेडकर चौक ते मिलिनियम स्कुल रस्ता विकसित करणे. | --- | ५० लाख |
| ३) प्रभाग क्र.३१ ड,मधील स.नं११ कर्वेनगर येथील प्राथमिक शाळेचे उर्वरित काम व स्थापत्य विषयक कामे करणे. | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०४८**

संदर्भ – १) मा.सुशिल मेंगडे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. २४/१२/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३०, दि.२४/१२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३१ अ मध्ये राजाराम पूल ते कर्वेनगर चौक या परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी र.रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०८, अ.क्र.१०, शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तदनुषंगिक कामे करणे (यादी क्र. एल २), पान क्र.२३२, अ.क्र.३, (CE20D 214+) नदी सुधारणा राबविणे (पीपीपी/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यामातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेले काम –** | | |
| प्रभाग क्र. ३१ अ मध्ये राजाराम पूल ते कर्वेनगर चौक या परिसरातील रस्ते विकसित करणे | --- | १ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. १०४९**

संदर्भ– १) मे.शासनाकडील पत्र शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१६/११४९/प्र.क्र.६७०/१६२२, दि.१३/७/२०१७

२) श्री.शशी नारायण पोडुवाल यांचे पत्र आ.क्र.८६१, दि.२१/७/२०१७

३) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.मआ/श.अ./३८७, दि.२२/९/२०१७

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७५, दि.१३/१०/२०१७

५) मनपा ठराव क्र.६८९, दि.२७/११/२०१७

६) मनपा ठराव क्र.८७३, दि.२१/१२/२०१७

७) मनपा ठराव क्र.१९२,दि.१९/७/२०१८

विषय– पुणे, पेठ खराडी स.नं.५७,हि.नं.२अ व २ब या मिळकतीचे आरक्षणाबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

विषयांकित बाबत मे.महाराष्ट्र शासनामार्फत दि.१३/२/२०१४ रोजी मंजूर आराखडयामध्ये दर्शविणेत आलेले प्राथमिक शाळा-ईपी-७५ व खेळाचे मैदान-ईपी-७५ ही आरक्षणे मा.महापालिका आयुक्त यांचे पत्रासोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे मे.शासनाच्या उपरोक्त आदेशान्वये वगळणेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करण्यास मान्यता देण्यात यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१३, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे. )**

**विषय क्र. १०५०**

संदर्भ– १) मा. सौ. ज्योती किशोर गोसावी व मा.प्रसन्न जगताप यांचे दि. १३/०७/२०१८ चे पत्र

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ११९,दि. २७/०७/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/शअ/७६१ दि.३०.११.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१८, दि.१४/१२/२०१८

विषय– पुणे पेठ हिंगणे खुर्द स.नं. १९, निलाय कॉम्पलेक्स येथे ओढ्यावरती कल्वर्ट टाकून १२ मी. रस्ता कलम २०५ अन्वये रस्ता आखणेस मान्यता मिळणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारत घेवून तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

पुणे पेठ हिंगणे खुर्द स.नं. १९, निलाय कॉम्पलेक्स येथे ओढ्यावरती कल्वर्ट टाकून वस्तुस्थिती व वाहतुकीची होणारी सोय पाहता कलम २०५ अन्वये रस्ता अलायमेंट मा. महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशानुसार निश्चित करणे व त्यानुसार सदर १२.०० मी. रूंद व अंदाजे २५.०० मी. लांबीचा कलम २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र. १०५१

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/७२५,दि.२६/११/२०१८ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१९, दि.१४/१२/२०१८

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे कोथरूड स.नं.८२,हि.क्र ६/२, सि.स. नं.१५८४ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ऋषभ इन्फ्रास्ट्रक्चर्स | सी | २७३९.८७ चौ.मी. (इमारती सी चे आर.सी.सी. व वीट बांधकामा पोटी अनुज्ञेय ३५% टी.डी.आर) | ००४५२७ | नोव्हेंबर २०१८ |

विषय क्र. १०५२

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/७८४,दि.४/१२/२०१८ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२०, दि.१४/१२/२०१८

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.१२९/१ अ (पार्ट) फा.प्लॉ.नं. ५७१ ब पर्वती पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे. केदार असोसिएटस | सी | २२६२.९८चौ.मी.(इमारतीचे आर.सी.सी. व वीट बांधकाम पुर्ण झाले पोटी अनुज्ञेय ३५% टी.डी.आर ) | ००४५२५ | ऑक्टोबर २०१८ |

विषय क्र. १०५३

संदर्भ- १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९८,दि. ०९/०२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/७९० दि.०७.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२१, दि.१४/१२/२०१८

विषय- कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा-या पौड कचरा रॅम्पची जागा मेट्रोसाठी दिल्यामुळे रॅम्प करीता पर्यायी जागा उपलब्ध होणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून

कोथरूड कचरा डेपो येथे सुमारे २५ वर्ष पासून कचरा हस्तांतरन केंद्र (Ramp) द्वारे कच-याचे दळणवळण सुरू आहे. या भागात कोथरूड व वारजे क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रात निर्माण होणा-या सुमारे २५०-३०० मे. टन कचरा १०० वाहन मार्फत संकलीत केला जात असून या कच-याची वाहतूक कचरा

हस्तांतरन केंद्रा मार्फत पुणे महानगरपालिकेच्या विविध कचरा प्रकल्पावर तसेच landfill site वर केली जाते. सदरची वाहनांची पार्किंग व्यवस्था ही या ठिकाणी आहे.

सध्यस्थितीत संदर्भ क्र. २ अन्वये सदर जागा मेट्रो प्रकल्पासाठी देण्यात आली असून याठिकाणी कचरा डेपोच्या जागेवर मेट्रो स्टेशन उभारण्याचे नियोजन आहे. हे स्टेशन कार्यान्वित झाल्यानंतर या ठिकाणी कचरा हस्तांतराचे काम करणे शक्य होणार नाही यामुळे कच-याच्या वाहतूकीस मोठी अडचण निर्माण होणार आहेत. निर्माण होणा-या कच-याची कात्रज हस्तांतरण केंद्रा पर्यंत वाहतूक करावी लागणार आहे. सदर वाहतुकी करीता अतिरिक्त खर्च होणार असून, कोथरूड ते कात्रज अशा खेपा करायच्या झाल्यास त्याकरीता आवशक वेळ वाढणार आहे व सदर वाहनांचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होणार नाही तसेच दैनंदिन कचरा उठावावर परिणाम होऊन कोथरुड व वारजे क्षेत्रिय कार्यालयाचा कार्यक्षेत्रात आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून सबब भागाकरीता रॅम्पची आवश्यकता आहे.

या संदर्भात कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा-या पौड कचरा रॅम्प स्थलांतरीत करण्याकरीता पर्यायी जागा मिळणेकरीता प्रस्ताव मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(विशेष) यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये बावधन खुर्द स.नं. ६४ येथील जकात नाक्याची जागा सुचविण्यात आली आहे. याबाबत मालमत्ता व्यवस्थापन विभागाचा अभिप्राय घेतला असता संदर्भ क्र. १ मा. मुख्य सभा ठराव क्र. ९८४दि. २९/०१/२०१८ नुसार सदर जागा ३० वर्षे मुदतीसाठी परिवहन महामंडळास देण्यात आली असून दि. १६/०४/२०१८ रोजी ताबापावतीने परिवहन महामंडळास देण्यात आली आहे. याबाबतीत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे ७८०० चौ.मी. जागेपैकी ४००० चौ.मी(सुमारे १ एकर) जागा देणेबाबत विनंती करण्यात आली होती. याबाबत सदर जागा कचरा हस्तांतरण केंद्रासाठी देणे शक्य होणार नाही असे त्यांनी कळविले आहे.

परंतु सदर सुचविलेली जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी योग्य असून या जागेवर रॅम्प उभारल्यास कोथरूड व वारजे क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रात निर्माण होणा-या कच-याच्या वाहतुकीच्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा निघणे शक्य होणार आहे.

सद्यस्थितीत सदर जागेपैकी अंशत: जागेचा वापर परिवाहन महामंडळामार्फत करण्यात येत असून उर्वरित वापरात नसल्याचे दिसून येते. सदर बाबतीस मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८ मुद्दा क्र. १ नुसार महानगरपालिकेस आवश्यकता असेल त्या वेळेस सदर जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ प्रशासनास सदर जागा पुणे महानगरपालिकेस परत करावी लागेल असे नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन सदर जागी कचरा हस्तांतरण केंद्र उभारणे शक्य होणार आहे.

तरी वरील गोष्टींचे अवलोकन होवून बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील ७८०० चौ.मी. जागा महानगर परिवहन महामंडळाकडून परत घेऊन सदर जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी आरक्षित करून मिळावी याकरीता खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील पुणे महानगर परिवहन महामंडळ यांना मनपाकडून देण्यात आलेली ७८०० चौ.मी. जागा परत घेऊन कचरा हस्तांतरण केंद्रा करीता देणेस.

२.बाबधन खुर्द स.नं. ६४ याठिकाणी कचरा हस्तांतरण केंद्राची उभारणी करणेस.

<u>नाव समितीचे निवेदन</u>

<u>विषय क्र. १०५४</u>

पुणे मनपा हद्दीतील उद्याने,रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत दि.१३/१२/२०१८ रोजी दुपारी ०३ =३० ( साडे तीन ) वाजताचे नाव समितीचे निवेदन विचारासाठी.

<u>मा.महापालिका आयुक्त यांची पत्रे.</u>

<u>विषय क्र. १०५५</u>

मौजे धानोरी, ता. हवेली. जि. पुणे येथील स. नं. ४८पै, ९०पै, ५२पै, ५१पै, ५५पै, ६७अपै, ८२पै, २२पै, २०पै, गावठाण पै, १पै, १८पै, १६पै, १७पै, यामधील जागा पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील २४ मी. विकास योजना रस्त्यासाठी संपादन (विश्रांतवाडी ते धानोरी लोहगाव हद्दीपर्यंत) करणेबाबत झालेला मनपा ठराव क्र.९९७,दि.२२/३/२०१७ ला अनुसरुन मा. अति. महा. आयुक्त विशेष यांचे जावक क्र. मआ/भूसंपादन/३०, दिनांक १९/४/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**( टिप - सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१४, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

<u>विषय क्र. १०५६</u>

त्वचारोग तज्ञ, एड्स नोडल ऑफिसर, मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर,कार्डिओलॉजिस्ट/हृद्यरोग तज्ञ, न्यायवैंद्यकशास्त्र तज्ञ/वैंद्यकिय अधिकारी (न्यायवैंद्यकशास्त्र), नेत्र शल्यचिकित्सक/नेत्रतज्ञ, रक्त संक्रमण

अधिकारी (वर्ग–१) ( वेतनश्रेणी – १५६००–३९१००+ ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र. /०१, दि.२/४/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९०८, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

**<u>विषय क्र. १०५७</u>**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कलामंदिर, येरवडा येथील उपलब्ध असलेल्या खोल्या प्रशासनाच्या कामकाजासाठी वापरण्यास अपुऱ्या पडत असल्याने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे कृती समितीस, त्यांच्या मागणीनुसार दोन खोल्या ग्रंथालयासाठी उपलब्ध करून देणे अडचणीचे असलेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य(बालगंधर्व) /८२९, दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**<u>विषय क्र. १०५८</u>**

**संदर्भ –** मा.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांची सूचना दि.११/४/२०१८

––––

पुणे महानगरपालिकेमध्ये यापूर्वी शिक्षण मंडळा मार्फत शालेय शिक्षण संदर्भातील काम पाहिले जात होते. राज्य शासनाने काही दिवसांपूर्वी शिक्षण मंडळ बरखास्त केल्यामुळे या खात्यातील कामामध्ये विस्कळीतपणा आल्याने सामान्य कुटुंबातील मुलांना मिळणारे शिक्षणाची हेळसांड होत आहे. शिक्षण समिती स्थापन न झाल्याने प्रशासनावरील वचक कमी होत आहे. त्यामुळे शिक्षण समिती स्थापन न होण्यामागील न कळण्यासारखे आहे. समिती स्थापन न करता प्रशासन कोणाचे हित जपत आहे. हे देखील न कळण्यासारखे आहे.

तरी महानगरपालिके तर्फे तातडीने शिक्षण समिती स्थापन करण्यात यावी.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९०६, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

**<u>विषय क्र. १०५९</u>**

संदर्भ – मा.सुशिल मेंगडे व मा.राजू बराटे यांची सूचना दि.१२/४/२०१८

१) मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२.
२) नाव समिती (नैमित्तीक समितीची)दि.२९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे निवेदन.
३) मनपा ठराव क्र.६४५, दि. ३०/११/२०१५
४) मा.अशोक येनपुरे व मा.गणेश बिडकर यांची दि. १८/१२/२०१५ ची उपसूचना.

––––

मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२ अन्वये पुणे मनपा हद्दीतील उद्याने, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना नावे देण्यासाठी नेमलेल्या नाव समिती ( नैमित्तीक समितीचे ) दि. २९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे अ.क्र.८३ वगळून निवेदन अवलोकन करून स्विकृत करण्यात येत आहे.

या मान्यतेप्रमाणे नावे देण्यासाठी व जरूर तेथे नाम फलक लावण्याची योग्य ती कार्यवाही मा. महा. आयुक्त यांनी करावी, अशी विनंती आहे.

असा मनपा विषय क्र.७८४, दिनांक २१/१२/२०१७ अनुमोदन नसल्याने वगळण्यात आला असून सदर विषयाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मनपा ठराव क्र.२२, दि. ३०/४/२०१२.
२) नाव समिती ( नैमित्तीक समितीची) दि. २९/१०/२०१५ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वाजताचे नाव समितीचे निवेदन.
३) मनपा ठराव क्र.६४५, दि. ३०/११/२०१५
४) मा.अशोक येनपुरे व मा.गणेश बिडकर यांची दि. १८/१२/२०१५ ची उपसूचना.

––––

मुख्य सभा ठराव क्र.६७१, दि. १८/१२/२०१५ मधील नाव समितीच्या निवेदनातील अ.क्र.७८ मधील नांव वगळून राजमाता जिजाऊ उड्डाणपूल असे नाव देण्यात यावे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९०७, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

विषय क्र. १०६०

संदर्भः- मा.पृथ्वीराज सुतार यांची सूचना दि.१९/३/२०१८

महाराष्ट्र राज्य सरकारने मुंबई मनपाच्या हद्दीत असणाऱ्या सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींचा मिळकत कर कायमस्वरूपी रद्द करून, सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींना यापुढे मिळकत कर लागू होणार नाही असा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय पुणे मनपाच्या हद्दीत असणाऱ्या सातशे स्क्वे.फूटापर्यंतच्या निवासी मिळकतींच्या बाबतीत सुध्दा घ्यावा,अशी विनंती मुख्य सभा मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांना करीत आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९०९, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

विषय क्र. १०६१

संदर्भ – मा. प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे यांची सूचना दिनांक १६/१/२०१८.
१) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २५/५/१९९३
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ८६ दि. २४/६/१९९३
३) वि.भू.सं.अ.क्र.१६ यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. भूसंपादन करणे/आढावा/जि.सभा/ २०१३- १४/३००६ दि. २/८/२०१३
४) मा.महा.आयुक्त यांचेसमवेत दि. ५/७/२०१६ रोजीची बैठक
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१७ दि.१५/४/२०१७ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१, दि.२८/६/२०१७

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे, पेठ कोंढवा खुर्द स.नं.४० (एलए-४२४) येथील जकात नाक्यासाठी भूसंपादन प्रस्ताव रद्द करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा विषय क्र.९४, दिनांक २५/९/२०१७ चा वगळण्यात आला असून सदर विषयाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २५/५/१९९३
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ८६ दि. २४/६/१९९३
३) वि.भू.सं.अ.क्र.१६ यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. भूसंपादन करणे/आढावा/जि.सभा/ २०१३- १४/३००६ दि. २/८/२०१३
४) मा.महा.आयुक्त यांचेसमवेत दि. ५/७/२०१६ रोजीची बैठक
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१७ दि.१५/४/२०१७ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१, दि.२८/६/२०१७
७) मनपा ठराव क्र.१६८,दि.१९/७/२०१८

----

पुणे, पेठ कोंढवा खुर्द स.नं.४० (एलए-४२४) येथील जकात नाक्यासाठी भूसंपादन प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१५, दि.१४/१२/२०१८ झाला आहे. )**

विषय क्र. १०६२

संदर्भः- १) मा.राजेश बराटे व मा.सौ.वृषाली चौधरी यांची सूचना दि.२३/४/२०१८
२) मनपा ठराव क्र.१८७, दि.१९/७/२०१८

----

महाराष्ट्र शासनाने ६ महिन्यापूर्वी महाराष्ट्रातील नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये झालेल्या बेकायदा बांधकामे नियमीत करण्यासाठी जो अध्यादेश काढला आहे. त्या आदेशाप्रमाणे सर्व सामान्य नागरिकाना भरावयास लागणारी दंडाची व मिप्रिमीयमचे अवाढव्य दर भरणे शक्य नाही. त्यामुळे गेले ६ महिन्यात फक्त १० प्रकरणे दाखल झाली आहेत.त्यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत २ लाखाहून अधिक बांधकामे नियमितीकरणाच्या प्रतिक्षेत आहे. त्या ठरावाद्वारे आम्ही महाराष्ट्र शासनास विनंती करतो की, गुंठेवारी पध्दतीने ही घरे नियमीत करून हया सर्व डेव्हलमेंट चार्जेस व प्रिमीयमचा महानगरपालिकांनी दर कमी करून दिल्यास नागरिकांना दिलासा मिळेल व दंडाद्वारे शेकडो कोटी रूपयांचे उत्पन्न महानगरपालिकेस मिळेल.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१७, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६३</u>

संदर्भः– मा.सौ.अर्चना पाटील यांची सूचना दि.२७/७/२०१८

––––

मराठा समाजास आरक्षण मिळतेकरिता तरूण होतकरू मराठा क्रांती मोर्चा सैनिक कै.काकासाहेब शिंदे यांनी गोदावरी नदीमध्ये जिवंत जलसमाधी घेतली. तरी कै.काकासाहेब शिंदे यांना शहिद हा दर्जा देण्यात यावा,अशी विनंती मा.राज्यशासनाला करण्यात यावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१८, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६४</u>

संदर्भः– मा.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांची सूचना दि.२७/७/२०१८

––––

पुणे बार असोसिएशन ही संस्था पुणे जिल्हयातील ही वकिलांची पालक संस्था आहे. दि.२२.३.१९७८ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये ठराव करून मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ औरंगाबाद येथे व एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करणेची विनंती मा.मुंबई उच्च न्यायालयात केंद्र सरकार, राज्य सरकार महामहिम मा.राष्ट्रपती यांनी केली. मुंबई उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या एकूण खटल्यापैंकी सुमारे ४० टक्के खटले पुणे महसूल विभागातून दाखल होतात. मुंबई उच्च न्यायालयातील आकडेवारी नुसार ३० हजार खटले पुणे जिल्हयातून प्रलंबित आहे. पक्षकारांना पश्चिम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अवाढव्य खर्च करून मुंबईला जावे लागते. सध्या मुंबई उच्च न्यायालयातील प्रलंबित खटल्यांचा ढीग वाढत चाललेला आहे. तरी वरील सर्व गोष्टींचा विचार करून मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे येथे सुरू करणे काळाजी गरज आहे. दि. २२.३.१९७८ व तद्नंतर केलेल्या सर्व ठरावांच्या अनुषंगाने पुन्हा एक वेळ महाराष्ट्र शासनाने अंमलबजावणीचा ठराव करून पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करावे अशी विनंती मा.मुख्य सभेमार्फत महाराष्ट्र शासनास विनंती करावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१९, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६५</u>

संदर्भ :– १) मा.योगेश ससाणे यांची सूचना दि.१२/१०/२०१७
२) मनपा ठराव क्र.७२०,दि.२१/१२/२०१७
३) मनपा ठराव क्र.६५६,दि.२७/९/२०१८

–––

पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सुमारे १ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पुणे महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ शासनाच्या आदेशानुसार बरखास्त झाले आहे. सध्या शिक्षण मंडळाचा कारभार हा प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत होत आहे. तदनंतर महाराष्ट्र शासनाने शिक्षण समिती गठित करणेबाबत आदेश दिलेले आहेत. परंतु महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे अदयाप पुणे महानगरपालिकेने शिक्षण समिती गठित केलेली नाही.

पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे १ लाखापेक्षा जास्त विदयार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता पुणे महानगरपालिकेची शिक्षण समिती त्वरीत गठित करण्यात यावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२२, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६६</u>

संदर्भः– १) मा.आबा उर्फ उल्हास बागुल यांची सूचना दि.७/३/२०१८
२) मनपा ठराव क्र.६६१,दि.२८/९/२०१८

––––

सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराला अनेक महान व दिग्गज व्यक्तिमत्वे लाभली आहेत. गेल्या ७० वर्षात त्यांच्या कार्याप्रती आदर आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळावी यासाठी त्या–त्या महान व्यक्तींच्या नावाने विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्यांचा सन्मान महापालिकेतर्फे करण्यात येतो, तोही तरतुदीनुसार.

मात्र राज्यशासनाच्या एका परिपत्रकामुळे या परंपरेत खंड पडण्याची स्थिती ओढवली आहे. काही

महापालिका आणि तेथील पदाधिकारी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी केलेल्या खर्चावरून न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यशासनाने पुरस्कार वितरणाला हरकत घेऊन त्यावर निर्बंध घातले आहेत. तसे परिपत्रक राज्यातील सर्व महापालिकांना पाठवले आहे. मात्र एक बाब निश्चित लक्षात घ्यावी कि, ज्या महनीय व्यक्तींचा सन्मान केला जातो. त्यांच्याकडून कधीही पुरस्काराच्या रकमेची मागणी होत नाही. महानगरपालिका ती रक्कम देत असते.

आता न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यशासनाने सरसकट पुरस्कार कार्यक्रमावर घातलेली बंदी चुकीची आहे. केवळ पुणे नाही तर अन्य महापालिकाही त्यांच्या त्यांच्या शहरातील महनीय व्यक्तींचा सन्मान करीत असते. मात्र जे पुरस्कार सुरू केलेले आहेत, ते कदापि बंद करू न करता महान व्यक्तिंचा मानपत्र देऊन सत्कार करावा. महान व्यक्तींच्या नावाने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण आणि त्यासाठी येणारा खर्च पाहता कोणतीही उधळपट्टी पुणे महानगरपालिकेकडून होत नसल्याचे निदर्शनास आणून देऊन या पुरस्कारांवर बंदीचे निर्बधांबाबत राज्यशासनाने पुनर्विचार करावा आणि सरसकट निर्बंधातून पुणे महानगरपालिकेस दिलासा देण्यासाठी प्रस्ताव / ठराव मुख्य सभेच्या मान्यतेने राज्यशासनाला पाठविण्यात यावा.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२३, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६७</u>

संदर्भः– १) मा.योगेश ससाणे व मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांची सूचना दि.२६/६/२०१८

२) मनपा ठराव क्र.६६२,दि.२८/९/२०१८

––––

पुणे महानगरपालिका दरवर्षी विकासकामे करणेसाठी डी.एस.आर.अंतिम करत असते. डी.एस.आर.अंतिम झालेनंतर त्याच्या दरास अनुसरून निविदा प्रक्रिया राबविली जाते. परंतु गेल्या आर्थिक वर्षातील डी.एस.आर.मधील काही आयटम्सचे दर हे बाजारभावापेक्षा अवास्तव वाढविलेले असून काही आयटम्सचे दर हे बाजारभावापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. उदा. बेंचेस खरेदी प्रकरणात त्याचे दर हे बाजारभावापेक्षा अवास्तव वाढविल्याने पुणे महानगरपालिकेचे कोटयावधी रूपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले होते.

तसेच काही आयटम्सचे दर हे डी.एस.आर.मध्ये बाजारभावापेक्षा कमी असल्याने व त्यानुसार निविदा प्रक्रियेची अंमलबजावणी करताना ठेकेदारांना परवडत नसल्याने प्रत्यक्ष काम निकृष्ठ दर्जाचे होत आहे. यामुळे विकासकामे पुन्हा पुन्हा करणेची वेळ पुणे महानगरपालिकेवर येवून कोटयावधी रूपयांचे नुकसान झाल्याचे अनेकवेळा सिध्द झाले आहे. पुणे महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसान होणारी ही बाब असून याप्रकरणी ठोस उपाय योजना करणे गरजेचे आहे.

सबब पुणे महानगरपालिकेचे मा.सभासद व पुणे महानगरपालिकेचे अधिकारी यांची डी.एस.आर.अंतिम करणेसाठी समिती गठीत करण्यात यावी.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२४, दि.१४/१२/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र. १०६८</u>

संदर्भः– मा.आबा उर्फ उल्हास बागुल यांची सूचना दि.१७/१२/२०१८

––––

पुणे शहर व अन्य शहरांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका हद्दीत असणाऱ्या विविध कंपन्यांना पायाभूत सुविधांसाठी सवलत दिली जाते. मात्र त्या कंपन्यांचा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सीएसआर फंड हा त्या त्या शहरात वापरला जात नाही. वास्तविक कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात सीएसआर हे एखाद्या निसर्गचक्राप्रमाणे असते. जे काही समाज, पर्यावरणाकडून मिळाले तेच पुन्हा त्यांना अर्पण करणे हे त्याचे उदात्त तत्व असते. त्यामुळे ज्या भागात कंपन्या आहेत. तिथेच या कंपन्यांचा सीएसआर फंड वापरला जाणे अत्यावश्यक आहे. किंबहुना जिथे कंपनी तिथेच कंपन्यांचा सीएसआर फंडचा विनियोग होणे अनिवार्य आहे. परंतु ते तसे न होता त्याचा फायदा महानगरपालिका व नगरपालिकांना मिळत नाही. केंद्र सरकारच्या सीएसआरच्या बदलाचा उपयोग महानगरपालिका, नगरपालिकेला कमी होत असताना डेव्हलेपमेंट फंड कमी प्रमाणात उपलब्ध होतो. हे आमचे निदर्शनास आले आहे. यासाठी सूट देत असताना महानगरपालिका व नगरपालिका यांना प्राधान्य देण्यात यावे व इन्कमटॅक्स असो किंवा अन्य बाबींसाठी सवलत मिळविण्यासाठी ज्या भागात, शहरात कंपनी तिथेच सीएसआर फंड वापरणे बंधनकारक करावे. यासाठी कायदयामध्ये कायद्यान्वये बदल करून कायदयात तरतूद करण्यासाठी मुख्यसभेने ठराव संमत करून तो पुणे इनकम टॅक्स तसेच राज्य सरकारमार्फत केंद्र सरकारकडे पाठवावा.

**विषय क्र. १०६९**

संदर्भः- मा. वसंत मोरे, गटनेते, मनसे व मा. साईनाथ संभाजी बाबर यांची सूचना दि.१९/७/२०१८

----

प्रभाग क्र. २७ मधील स.नं. ५७ कोंढवा खुर्द, येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या बहुउद्देशीय हॉलचे उद्घाटन मा. सौ. शर्मिलाताई राजसाहेब ठाकरे, यांचे हस्ते करण्यात यावे तसेच या कार्यक्रमासाठी स्थानिक खासदार, आमदार, नगरसेवक, व मनपाचे सर्व पदाधिकारी यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

**विषय क्र. १०७०**

संदर्भः- मा. सौ. सोनाली लांडगे, मा. सौ. स्वाती अशोक लोखंडे, मा. सौ. सरस्वती शेंडगे, मा. आनंद रमेश रिठे, व मा. अविनाश बागवे यांची सूचना दि.२५/७/२०१८

----

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती दि. १ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशात साजरी केली जाते. पुणे महानगरपालिकेत मातंग समाजाचे असंख्य कर्मचारी काम करीत आहेत. या कर्मचा-यांना मातंग समाजाचे दैवत असलेले साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करता येत नाही. सदर तारखेस पूर्ण दिवस सुट्टी जाहिर करण्याबाबत सदरचा प्रस्ताव मुख्यसभेमार्फत राज्यशासनाकडे पाठविण्यात यावा,ही विनंती.

**विषय क्र. १०७१**

संदर्भः- मा. संजय भोसले, गटनेते, शिवसेना यांची सूचना दि.१४/८/२०१८

----

प्रभाग क्र. ६ येरवडा, गुंजन चौक या ठिकाणाहुन एअर पोर्ट रोड व नगररोड ला जाणारा मुख्य रस्ता आहे. सदर ठिकाणी भविष्यामध्ये मेट्रो व फ्लाय ओव्हरला अडचण निर्माण होणार नाही कारण सदर शिल्प हे रस्ता व चौक व फुटपाथ सोडुन १५ फुट आत आहे.तरी गुंजन चौक हा रहदारीचा चौक असल्याने येथे श्री प्रभु रामचंद्र यांचे शिल्प शासनाच्या धोरणानुसार बसविण्यात यावे.

**विषय क्र. १०७२**

संदर्भः- मा. सौ. सुनिता वाडेकर, पक्षनेत्या, आर.पी.आय.व मा. सौ. सोनाली लांडगे यांची सूचना दि.२१/८/२०१८

----

पुणे महानगरपालिकेच्या नुतन इमारतीचे काम पुर्ण झाले असून सदर इमारतीचे दक्षिण बाजूस असलेल्या तळमजल्यावरील प्रवेशद्वाराच्या आतील मोकळया जागेमध्ये मध्यभागी भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा शासनाच्या धोरणानुसार बसविण्यात यावा.त्यासाठी आवश्यक असल्यास सदरचा अर्धपुतळा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे यांचे वतीने देण्यात येईल.

**विषय क्र. १०७३**

संदर्भः- मा. धनराज घोगरे यांची सूचना दि.२१/८/२०१८

----

संत मदर तेरेसा यांना भारतरत्न आणि नोबेल शांतता पुरस्कार सन्मानित एक भारतीय रोमन कॅथॉलिक नन होत्या. जागतिक किर्ती मिळविलेल्या जगातील महान महिला, सध्याच्या काळातील एक असामान्य थोर व्यक्ती, एक थोर समाज सेविका म्हणून मदर तेरेसा यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. गोर-गरीब, अनाथ-अपंग अशा लोकांना आपले समजुन जो प्रेमाने त्यांची सेवा करितो तोच खरा साधु संत होय. असे तुकाराम महाराजांनी एका श्लोकांत म्हटले आहे. त्या दृष्टी कोनातुन विचार केला असता मदर तेरेसा यांना खरोखरच संत म्हणणे योग्य आहे.मदर तेरेसा खुप धाडसी होत्या. बैरुत या ठिकाणी वेढा पडलेला असताना त्यांनी इ.स. १९८२ मध्ये पॅलेस्टेनियन बंडखोर आणि ईस्रायली सैनिक यांच्यात तात्पुरता समझोता घडवुन आणुन रेडक्रॉसच्या मदतीने ३७ लहान मुलांची सुटका घडवुन आणली होती.प्रभाग क्र. २५ अ मध्ये सोपानबाग येथील डोबरवाडी परिसरातील संत मदर तेरेसा उद्यान येथे संत मदर तेरेसा यांचा जीवनपट उलगडुन दाखविण्याकरीता शिल्प कलाकृती शासनाच्या धोरणानुसार उभारण्यात यावी.

**विषय क्र. १०७४**

संदर्भः- मा. सौ. अर्चना तुषार पाटील व मा. उमेश गायकवाड यांची सूचना दि.२३/८/२०१८

----

पुणे मनपा मधील नवीन इमारतीच्या दालनाबाहेर भारतरत्न तथा भारत देशाचे माजी पंतप्रधान स्व. मा. श्री. अटलबिहारीजी वाजपेयी यांचे तैलचित्र लावण्यात यावे.

<u>विषय क्र. १०७५</u>

संदर्भ:- मा. सुशिल शिवराम मेंगडे,अध्यक्ष शहर सुधारणा समिती यांची सूचना दि.२३/८/२०१८

----

पुणे शहर व जिल्हयामधील लोकसभा व राज्य सभा तसेच महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषद सदस्य व पुणे महानगरपालिकेतील सदस्यांपैकी उल्लेखनीय व कार्यक्षम सभा कामकाज करणा-या लोकप्रतिनिधीस माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ **"उत्कृष्ट सभागृह वक्ता"** पुरस्कार दरवर्षी मनपा वर्धापन दिनानिमित्ताने देऊन गौरविण्यात यावे. तसेच मा.पदाधिकारी, मा.पक्षनेते व प्रतिष्ठीत नागरिकांची समिती नेमण्यात यावी.

<u>विषय क्र. १०७६</u>

संदर्भ:- मा. श्रीमती रंजना टिळेकर, मा. वीरसेन जगताप व मा. सौ. वृषाली कामठे यांची सूचना दि.२३/८/२०१८

----

पुणे महानगरपलिकेतर्फे कात्रज-कोंढवा रस्त्याचा भुमिपुजन समारंभ गुरूवार दि. १ नोव्हेंबर २०१८ रोजी सायंकाळी ५.०० ( पाच ) वाजता मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री, मा.ना.गिरीष बापट, पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन,संसदीय कार्य, मा.ना. दिलीप कांबळे, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अनु.जाती-जमाती व विशेषसहाय्य, मा.ना.विजय शिवतारे, राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण, मा.ना.प्रदीप रावत, अध्यक्ष, नॅशनल शिपींग बोर्ड,मा.ना.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई, मा. अनिल शिरोळे, खासदार, यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा. शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार,मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा. संजय काकडे,खासदार, मा. योगेश टिळेकर, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा. विजय काळे, आमदार, मा.प्रा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार, मा. जगदीश मुळीक, आमदार, मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार,तसेच मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.योगेश मुळीक, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता, मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेते, मा.अरविंद शिंदे, पक्षनेते, कॉंग्रेस, मा.संजय भोसले, पक्षनेते, शिवसेना, मा.वसंत मोरे, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना,मा.सौ.अश्विनी लांडगे, पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम., मा.सौ.सुनिता वाडेकर, पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.सुशिल मेंगडे, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.राजश्री नवले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे ,अध्यक्षा,विधी समिती, मा.राहूल भंडारे, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा.महेश लडकत, अध्यक्ष,नाव समिती, मा.किरण दगडे पाटील, अध्यक्ष, जैवविविधता व्यवस्थापन समिती ,मा.वीरसेन जगताप, अध्यक्ष,कोंढवा-येवलेवाडी प्रभाग समिती व स्थानिक नगरसेवक,मा.किशोर उर्फ बाळाभाऊ धनकवडे, अध्यक्ष,धनकवडी-सहकारनगर प्रभाग समिती,
मा.सौ.संगिता राजेंद्र ठोसर,स्थानिक नगरसेविका, मा.सौ.वृषाली सुनील कामठे, स्थानिक नगरसेविका, मा.श्रीमती रंजना टिळेकर, स्थानिक नगरसेविका, मा.दत्तात्रय धनकवडे,नगरसेवक, मा.सौ.राणी भोसले, नगरसेविका, मा.सौ.मनिषा कदम, नगरसेविका, मा.प्रकाश कदम, नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १०७७</u>

संदर्भ:- मा. प्रा. सौ.ज्योत्स्नाताई गजानन एकबोटे, मा. सिध्दार्थ अनिल शिरोळे व मा.सौ. स्वातीताई अशोक लोखंडे यांची सूचना दि.२७/८/२०१८

----

छत्रपती संभाजी महाराजांनी वयाच्या १८ व्या वर्षी संस्कृत भाषेमध्ये बुधभूषण हा ग्रंथ रचला होता. त्यांच्या हया ग्रंथाची माहिती विश्वभर पोहचवण्यासाठी बुधभूषण ग्रंथ रचतानाचे छत्रपती संभाजी महाराजांचे शिल्प (शंभु शिल्प), गौरवशाली इतिहास जिवंत करण्यासाठी तब्बल ८ ते १० फुट श्री. शंभुछत्रपती ग्रंथ रचताना बसलेले शिल्प प्रभाग क्र. १४ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने असलेल्या संभाजी उद्यान, जंगली महाराज रोड, पुणे येथे शासनाच्या निर्णयाप्रमाणे उभारणे अत्यंत गरजेचे आहे.त्यासाठी आमदार अनिल शिवाजीराव भोसले यांनी आपल्या २०१३-२०१४ मुलभूत सोयी सुविधा विशेष अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.तरी सदर शिल्प त्वरीत करण्यात यावे.

<u>विषय क्र. १०७८</u>

संदर्भ:- मा. सुशिल शिवराम मेंगडे, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. राजेश किसन बराटे व मा. वृषाली दत्तात्रय चौधरी यांची सूचना दि.३/९/२०१८

----

प्रभाग क्र. ३१, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, स.नं. ११ कर्वेनगर येथील नव्याने विकसित केलेल्या उद्यानाचा उद्घाटन समारंभ पालकमंत्री मा. गिरिश बापट यांचे हस्ते, महापौर मा. मुक्ताताई टिळक यांचे अध्यक्षतेखाली तसेच खासदार मा. अनिलराव शिरोळे व भाजपा शहराध्यक्ष मा. योगेशदादा गोगावले, यांच्या प्रमुख उपस्थितीत व पुणे शहरातील सर्व मा. खासदार, मा. आमदार, मा. पक्षनेते, पुणे महानगरपालिकेचे सर्व मा. पदाधिकारी व माजी नगरसेवक शिवराम मेंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात यावे.या उद्घाटन कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

<u>विषय क्र. १०७९</u>

संदर्भः- मा. सुशिल शिवराम मेंगडे, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. राजेश किसन बराटे व मा. वृषाली दत्तात्रय चौधरी यांची सूचना दि.३/९/२०१८

----

प्रभाग क्र. ३१, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, स.नं. १४ कर्वेनगर येथील जावळकर उद्यानामध्ये विकसित करण्यात आलेल्या टॉयट्रेनचे उद्घाटन समारंभ पालकमंत्री मा. गिरीश बापट यांचे हस्ते, महापौर मा. मुक्ताताई टिळक यांचे अध्यक्षतेखाली तसेच खासदार मा. अनिलराव शिरोळे व भाजपा शहराध्यक्ष, मा. योगेशदादा गोगावले, यांच्या प्रमुख उपस्थितीत व पुणे शहरातील सर्व मा. खासदार, मा. आमदार, मा. पक्षनेते, पुणे महानगरपालिकेचे सर्व मा. पदाधिकारी व माजी नगरसेवक शिवराम मेंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात यावे.या उद्घाटन कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

<u>विषय क्र. १०८०</u>

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक, बिबवेवाडी येथील आवारात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा अर्धकृती ब्रॉंझ पुतळा बसविणेबाबत मा.अति.महा.आयुक्त ( ज ) यांचे जा.क्र.मआ/भवन/५१२, दि.२१/९/२०१८ चे पत्र.

<u>विषय क्र. १०८१</u>

संदर्भः- मा. दिलीप वेडेपाटील यांची सूचना दि.२८/९/२०१८

----

पुणे महानगरपालिका प्रभाग क्र. १० बावधन – कोथरुड डेपो मध्ये राहत असणारे कु. सिध्दांत राहुल कांबळे यांनी नुकत्याच कोरिया (नेमवान) येथे झालेल्या १८ व्या एशियन रोलर स्केटींग चॅम्पियनशिप स्पर्धेत सिनियर गटामध्ये रिले रेस (३००मीटर) स्पर्धेत- कांस्य पदक, कु. विक्रम इंगळे हया खेळाडूने सिनियर गटात वैयक्तिक (५००मीटर) रेसमध्ये – कांस्य पदक व कु. अथर्व कुलकर्णी या खेळाडूने ज्युनियर गटात रिले रेस (३०००मीटर) स्पर्धेत – कांस्य पदक मिळवून जागतिक पातळीवर आपल्या पुणे शहराचे नावलौकिक केले आहे.अश्या गौरवास्पद खेळाडूंचा आदर सत्कार २६ जानेवारी रोजी पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात यावा.

<u>विषय क्र. १०८२</u>

संदर्भः- मा. सौ. मंजुश्री खर्डेकर व मा. सौ. माधुरी सहस्त्रबुध्दे यांची सूचना दि.१२/११/२०१८

----

पुणे महानगरपलिका आणि महामेट्रो यांचे संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात येणा–या प्रभाग क्र. १३ मधील स्वातंत्र चौक ते एस.एन.डी.टी. कॉलेज, कर्वेरोड येथील दु–मजली उड्डाण पुलाचे भुमिपुजन समारंभ शुक्रवार दि. १६ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी ४.३० ( चार वाजून तीस मिनिटे) वाजता मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री, मा.ना.गिरीष बापट, पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन,संसदीय कार्य, मा.ना. दिलीप कांबळे, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अनु.जाती–जमाती व विशेषसहाय्य, मा.ना.विजय शिवतारे, राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण, मा.ना.प्रदीप रावत, अध्यक्ष, नॅशनल शिपींग बोर्ड,मा.ना.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई, यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा. अनिल शिरोळे, खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार,मा. अॅड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा. संजय काकडे,खासदार, मा.प्रा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा. विजय काळे, आमदार, मा. योगेश टिळेकर, आमदार,मा. जगदीश मुळीक, आमदार, मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ,

आमदार,तसेच मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.योगेश मुळीक, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता, मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेते, मा.अरविंद शिंदे, पक्षनेते, काँग्रेस, मा.संजय भोसले, पक्षनेते, शिवसेना, मा.वसंत मोरे, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना,मा.सौ.अश्विनी लांडगे, पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम., मा.सौ.सुनिता वाडेकर, पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.सुशिल मेंगडे, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.राजश्री नवले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे ,अध्यक्षा,विधी समिती, मा.राहूल भंडारे, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा.महेश लडकत, अध्यक्ष,नाव समिती, मा.किरण दगडे पाटील, अध्यक्ष, जैवविविधता व्यवस्थापन समिती , मा.दिपक पोटे, अध्यक्ष, वारजे–कर्वेनगर प्रभाग समिती व स्थानिक नगरसेविक, मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे,स्थानिक नगरसेविका, मा.सौ.मंजुश्री खर्डेकर, स्थानिक नगरसेविका, मा.जयंत भावे, स्थानिक नगरसेवक,मा.मुरलीधर मोहोळ, नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १०८३</u>

संदर्भः– मा. सौ. स्मिता वस्ते व मा. अजय खेडेकर यांची सूचना दि.३०/११/२०१८

––––

पु.ल. देशपांडे महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्राला पडलेले सुंदर स्वप्न, सिध्दहस्त लेखक, नटवर्य, नकलाकार, कवी, संगित, दिग्दर्शक, वक्ते अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्वाने पुणे शहराच्या नावलौकिकात मोलाची भर टाकलेली आहे. पु.ल. देशपांडे यांच्या स्मरणार्थ साहित्य, कला, संगित, दिग्दर्शक, वक्तृत्व तसेच शिक्षण क्षेत्राच्या लौकिकात भर घालणा–या विभूतींना पु.ल. देशपांडे पुरस्कार प्रदान करुन पुणे महानगरपालिकेकडून सन्मानीत करण्यात यावे.

**( टिप – विषय क्र. १०६९ ते १०८३ हे दि.६/१२/२०१८ रोजी मा.पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झालेले आहेत.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ७/१/२०१९.

**सुनील पारखी,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**